-

<u>नियमीत दिवाणी दावा क्रं. ३२/२०१२ मधील नि. १५३ खाली आदेश</u>

प्रस्तुत दावा वादीने वाटप, ठराव व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे.

०२. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. ६ विठ्ठल सदाशिव गोळे हे दि.०१-०७-२०२३ रोजी मयत झाले आहेत. सदर प्रतिवादी क्र. ६ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफीचा अर्ज दाखल केला आहे. वादी यांनी मुदतीत वारस रेकॉर्डवर न घेतल्याने तांत्रिकदृष्टया दावा अबेट झालेला आहे. सदर अबेटमेंटची ऑर्डर सेट असाईड झालेस दाव्याचा गुणदोषावर सुनावणी होणेस मद होणार आहे. सबब, अबेटमेंट सेट असाईड करावी अशी विनंती वादी यांनी केली आहे.

०३. सदर अर्जावर मागील बाजुस प्रतिवादीने म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीने असे नमुद केले आहे की, सदर कामी वादी यांनी सदरचा अर्ज हा मोघम स्वरुपाचा दिलेला असून सदरील अर्जात कोणतेही संयुक्तीक कारण नाही. सबब, सदरचा अर्ज हा नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. वादीचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. ६ यांचे वारस असल्यास त्यांचा खटला दाखल करण्याचा अथवा विरोधी पक्ष राहण्याचा अधिकार हा जिवंत राहिला असल्याने त्या संदर्भात त्यांना रेकॉर्डवर घेण्याकरीता परवानगी न दिल्यास गुंतागुंत वाढू शकेल आणि अर्जाचा गुणदोषावर निर्णय देणेस अडचण निर्माण होईल. सदर कामी प्रतिवादी क्र. ६ विठ्ठल सदाशिव गोळे हे दि. ०१/०७/२०२३ रोजी मयत झाले आहेत. त्यांच्या मृत्युचा दाखला नि.क्र. १५७ यादी द्वारा दाखल आहे.

**०५.** प्रस्तुतच्या अर्जात नमुद केलेली कारणमिमांसा व दाव्यात निघुन गेलेला वेळ हे जुळून येत नसले तरी वादीचे वारस यांना त्यांची बाजू मांडण्याचा हक्क आहे. सबब, दाव्याचा अंतिम निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी व वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरित्या संपुष्टात येण्याच्या दृष्टीने हा अर्ज मंजूर करीत आहे. वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

अर्ज मंजूर करण्यात आला.

Sd/-

दि.०४.०१.२०२३.
भोर .

(एन.के.नागरगोजे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
भोर

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | – | Smt. S.A.Sonawane |
| Court Name | – | Hon'ble Smt. N.K.Nagargoje |
| Date of Order/Judgment | – | 04/01/2024 |
| Date of Sign Order/Judgment | – | 04/01/2024 |
| Order uploaded on | – | 08/01/2024 |